सकाळ
पिंपरी-चिंचवड TODAY पुणे, सोमवार, २ डिसेंबर २०२४



# विद्यार्थ्यांना 'स्ट्रेस मॅनेजमेंट'चे धडे

■ श्रुती गांधी (रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसी चिंचवड)

कॉलेज कट्टा

श्री जैन विद्या प्रसारक मंडळ संचालित चिंचवड येथील रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट अंतर्गत 'स्ट्रेस मॅनेजमेंट' विषयावर किशोर डांगे आणि सुनील कर्डिले (तेजज्ञान फाउंडेशन) यांचे व्याख्यान झाले. विद्यार्थ्यांना तणावाविरहित जीवन कसे जगावे याविषयी त्यांनी माहिती दिली. मेडिटेशन कसे करावे, याचे प्रात्यक्षिक सादर केले. सूत्रसंचालन प्रा. मंजुश्री गुंजेगावकर यांनी केले. प्रा. सविता पाटील यांनी आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश धारिवाल, कार्याध्यक्ष शांतिलाल लुंकड, ऑनररी जनरल सेक्रेटरी अॅड. राजेंद्रकुमार मुथा, कोषाध्यक्ष प्रकाशचंद चोपडा, प्राचार्य डॉ. सचिन फेगडे यांनी मार्गदर्शन केले.

## मतदार जागृती मोहीम

रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाची टक्केवारी वाढीसाठी विविध कार्यक्रम झाले. नागरिकांमध्ये मतदान करण्याबाबत जागृती करण्यात आली. मतदार शपथ, रांगोळी, चित्रकला, मतदार चिठ्ठी मतदारांना देणे यांसह घरोघरी भेट देऊन मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करणे आदी उपक्रम राबविले. रांगोळीच्या माध्यमातून मतदारांना संदेश दिला. मतदार जागृतीविषयक चित्रकला स्पर्धा झाली. विद्यार्थ्यांनी पालकांना पत्र लिहून मतदानाचे महत्त्व पटवून दिले, प्राचार्य डॉ. सचिन फेगडे यांनी मार्गदर्शन केले.

RASIKLAL M. DHARIWAL COLLEGE OF PHARMACY
D-PHARM
Chinchwad Station,
Pune-411 019.

PRINCIPAL
RASIKLAL M. DHARIWAL
COLLEGE OF PHARMACY
Chinchwad Station, Pune-411 019